# गच्चीवर पत्रा शेड उभारण्याबाबत लागणारी परवानगी आणि सोबत जोडण्यात येणारी कागदपत्रे

## बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र :एमडीबी/ ओडी/5577 दि . 23/12/2021

विषय: बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील गच्चीवरील पावसामुळे होणा-या गळतीमुळे इमारतीची होणारी हानी टाळण्यासाठी संपूर्ण गच्ची आच्छादित करण्यासाठी शेड उभारण्याबाबत.

संदर्भ: मान. महानगरपालिका आयुक्त यांची MGC/F/5721 दि. 16/12/2021 अन्वये मान्यता.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व (निवासी, अनिवासी व आद्योगिक) इमारती ज्यांना 20 वर्षे किंवा अधिक वर्षे झालेली आहेत व ज्या इमारतींच्या गच्चीमधुन गळती होत आहे व इमारतींची हानी होत आहे व ज्या इमारतींची उंची 24 मीटर पेक्षा कमी आहे केवळ अशाच इमारतींच्या गच्चीवर इमारतींच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन पावसाळी गळती रोखण्याकरिता शेड बसविण्यासाठी परवानगी देण्याकरिता मान. महानगरपालिका आयुक्त यांची MGC/F/5721 दि. 16/12/2021 अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

मान. महानगरपालिका आयुक्त यांच्या मंजुरी क्र. MGC/F/2203 दि. 1/6/2020 नुसार ऑनलाईन परवानगीबाबत नवीन सॉफ्टवेअर तयार होईपर्यंत सर्व परवानग्या संबंधित विभागीय सहायक आयुक्त / पदनिर्देशित अधिकारी यांच्या ईमेल द्वारे अर्ज प्राप्त करुन संबंधित धोरणाच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून संबंधित विभागीय सहायक आयुक्त / पदनिर्देशित अधिकारी यांच्या ईमेल द्वारे अर्जदारास देण्यात याव्यात.

सोबत: (परिपत्रक व परिशिष्ट-1)

23/12/2021

सह आयुक्त (परिमंडळ-1)

प्रत रवाना:

मान. म.न.पा. आयुक्त / अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प)/ अतिरिक्त आयुक्त (शहर)/ अतिरिक्त आयुक्त (पूर्व उपनगरे)/सह आयुक्त/उपायुक्त (आपत्ती व्यवस्थापन)/ संचालक (अभियांत्रिकी सेवा व प्रकल्प)

उपायुक्त (विशेष अभियांत्रिकी)/ उपायुक्त (अभियांत्रिकी / उपायुक्त (आयुक्त कार्यालय)

# गच्चीवर पत्रा शेड उभारण्याबाबत लागणारी परवानगी आणि सोबत जोडण्यात येणारी कागदपत्रे

## परिशिष्ट १
(अर्जासोबत अर्जदाराने जोडावयाच्या कागदपत्रांची यादी)

१) इमारतींच्या अधिकृततेबद्दलचे मान्यतेचे नकाशे व आवश्यक असलेले स्वयं घोषित प्रतिज्ञापत्र.

२) अर्जदाराचे आधारकार्ड व मोबाईल क्रं.

३) नोंदणीकृत संरचनात्मक सल्लागार (Structural Consultant) यांचेकडून उभारण्यात येणाऱ्या शेडचा मोजमापासह स्थळ दर्शक नकाशा.

४) नोंदणीकृत संरचनात्मक सल्लागार (Structural Consultant) यांचेकडून प्राप्त केलेले इमारतींचे व त्यापुरत्या शेडचे स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी सर्टिफिकेट जोडणे आवश्यक आहे. तसेच त्यात स्टॅबिलिटी कालावधी नमूद करणे आवश्यक आहे.

५) शेड उभारण्या पूर्वी चा फोटो (अर्जासोबत) .

६) जर इमारतीची उंची 7 मजल्यांपेक्षा जास्त असेल तर C.F.O. (प्रमुख अग्निशमन अधिकारी यांचे कार्यालय) यांचे नाहरकत प्रमाणपत्र जोडणे.